# जळगाव शहर महानगरपालिका शिक्षण विभाग,जळगाव

ज.श.म.न.पा.शिक्षण मंडळ कार्यालय, नटवर टॉकीज मार्ग, जळगाव -425001
ईमेल - ssamncjalgaon@gmail.com

जा.क्र.जशमनपा/शिक्षण/परिपत्रक/2026/२७ दि.२२/04/2026.

प्रति,

प्राचार्य / मुख्याध्यापक,

सर्व मनपा / खाजगी उच्च प्राथ./माध्य./शाळा व विद्यालय,

सर्व माध्यम व सर्व व्यवस्थापन मनपा शहरी भाग, जळगाव.

विषय:- मित्र उपक्रमांतर्गत विपश्यना आनापान ध्यान साधना आयोजीत प्रशिक्षण सत्राबाबत.

संदर्भ :- मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांचे जा.क्र.शिउसं/नावि/स्वियसहा/मित्र उपक्रम/2025/4910 दि.31/03/2026.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, जळगाव शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यम व सर्व व्यवस्थापनाच्या उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे मानसिक व बौध्दिक वाढी करीता विपश्यना आनापान ध्यान साधना प्रशिक्षण सत्र खालील ठिकाणी उपरोक्त सर्व शाळा मुख्याध्यापक यांचेसाठी आयोजीत करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | प्रशिक्षण शिबीर आयोजन ठिकाण | प्रशिक्षण शिबीर दिनांक | प्रशिक्षणाची वेळ |
|---|---|---|---|
| 1 | प.न.लुंकड कन्या शाळा, ख्वाजामियाँ दर्गा जवळ, जळगाव | 24/04/2026 शुक्रवार रोजी | सकाळी 09:00 ते 12:00 |

वरील प्रमाणे नमूद ठिकाणी व दिलेल्या वेळेत प्रशिक्षण शिबीरास सर्व शाळा मुख्याध्यापकांनी वेळेत उपस्थित रहावे. तसेच ज्या शाळा द्वि शिक्षकीय आहेत, अशा शाळांमधील कोणत्याही शिक्षकास दि.24/04/2026 रोजी रजा मंजूर करण्यात येवू नये. सदर दिवशी शाळा बद राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी जेणेकरुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

सदर प्रशिक्षणाकरीता समन्वयक म्हणून शेख वसीम व श्रीम.वृषाली चौधरी, विशेष शिक्षक यांनी कामकाज पहावे.

प्रशासन अधिकारी
मनपा शिक्षण विभाग,जळगाव

प्रत माहितीस्तव सविनय सादर,

1) मा.शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक
2) मा.शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि.प.जळगाव
3) समन्वयक, मित्र उपक्रम